# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 07 December 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०७ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

राज्य विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाला आज सकाळी अकरा वाजता सुरूवात झाली. विधानसभेचे हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी विधानसभा अध्यक्ष निवडीच्या कार्यक्रमाची माहिती दिली. यानंतर सदस्यांच्या शपथविधीला सुरूवात झाली.

अस्थायी अध्यक्षांच्या तालिकेवरील सदस्यांच्या शपथविधीनंतर सर्वप्रथम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्या पाठोपाठ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा शपथविधी पार पडला. गिरीश महाजन यांनी संस्कृतमधून सदस्यत्वाची शपथ घेतली. आज शनिवारी आणि उद्या रविवारी उर्वरीत नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी पार पडणार आहे.

****

दरम्यान, नव्याने गठित विधानसभेच्या अध्यक्षांची परवा नऊ डिसेंबर रोजी निवड केली जाणार आहे. त्यासाठी उद्या दुपारी बारा वाजण्यापूर्वी प्रस्ताव सादर करण्याचा अवधी निश्चित करण्यात आला आहे. विधानसभेचे हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी यासंदर्भातील घोषणा आज केली, तर येत्या १६ डिसेंबरच्या आत मंत्रिमंडळाचा विस्तार होणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

****

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय प्रमुख आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जप्त केलेली संपत्ती मुक्त करावी, असे आदेश दिल्लीतील न्यायाधिकरण न्यायालयानं आयकर विभागाला दिले आहेत.

आयकर विभागानं ऑक्टोबर २०२१ मध्ये छापा टाकून अजित पवार आणि त्यांच्या कुटुंबीयांशी संबंधित असलेली सुमारे एक हजार कोटी रुपयांची संपत्ती जप्त केली होती. यासह मुंबईतील प्रतिष्ठित नरिमन पॉइंट येथील निर्मल टॉवरसह पाच मालमत्ता

जप्त करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये, एक साखर कारखाना आणि एका रिसॉर्टचाही समावेश होता. मात्र, याबाबत अजित पवारांनी न्यायालयात दाद मागितली होती. दिल्ली नायाधीकरण न्यायालयानं यावर काल सुनावणी घेत आयकर विभागाची याचिका फेटाळली आणि अजित पवारांची जप्त संपत्ती मुक्त करण्याचे आदेशही दिले.

****

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आगामी वर्षातील केंद्रीय अर्थसंकल्प सादर करण्यापुर्वी आज नवी दिल्ली इथं एक बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी विविध शेतकरी संघटना आणि कृषी अर्थतज्ज्ञांसोबत सल्लामसलत केली.

****

केंद्रीय मंत्रिमंडळाने काल देशभरात ८५ केंद्रीय विद्यालयं स्थापित करण्यास मंजुरी दिली. यापैकी तीन केंद्रीय विद्यालयं महाराष्ट्रातील असून त्यापैकी एक पुण्यात स्थापित होईल. पुण्यातील सुडुंब्रे इथल्या एनडीआरएफ कॅम्पस याठिकाणी हे केंद्रीय विद्यालय स्थापन केलं जाईल. यासोबतच, देशात २८ नवीन नवोदय विद्यालयं स्थापन करण्यास मंजुरी मिळाली असून त्यापैकी एक ठाणे जिल्ह्यात स्थापन केलं जाणार आहे.

****

भारतीय नागरिकांनी पुढील सूचना मिळेपर्यंत सीरियाचा प्रवास टाळण्याचा सल्ला भारत सरकारनं दिला आहे. सीरियात वाढत असलेले बंडखोरांचे हल्ले आणि नागरिकांच्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने आपल्या नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केली आहे.

सीरियातील सध्याची असुरक्षित परिस्थिती पाहता, भारतीय नागरिकांनी पुढील सूचना मिळेपर्यंत सीरियाला जाणं टाळावं. जे लोक परत येऊ शकतात, त्यांनी लवकरात लवकर व्यावसायिक उड्डाणं करून मायदेशी परत यावं आणि इतरांनी त्यांच्या सुरक्षेबाबत अत्यंत सावधगिरी बाळगावी, असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटलं आहे.

****

बीड जिल्ह्यात काल सकाळपासून अवकाळी पाऊस सुरू असून यामुळं शेती पिकं आणि फळबागांचं नुकसान होत आहे. या पार्श्वभुमीवर जिल्हा प्रशासनाने नुकसानीचे पंचनामे करून सरसकट भरपाई द्यावी, अशी मागणी आमदार संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाकडे एका पत्राद्वारे केली आहे. बीड जिल्हा प्रशासनाने झालेल्या नुकसानीची

तक्रार क्रॉप इन्शुरन्स ॲपवर करण्यासाठी तलाठी आणि संबंधित यंत्रणे मार्फत शेतकऱ्यांना कळवावं, तसंच घटनास्थळी जाऊन पंचनामे करावेत आणि शेतकरी बांधवांना सरसकट नुकसान भरपाई मिळवून द्यावी, अशीही क्षीरसागर यांची मागणी आहे.

****

सांगली जिल्ह्यातल्या काही भागात आज पहाटे पाच वाजता जोरदार पाऊस झाला. यामुळं काही ठिकाणी विद्युत पुरवठा खंडित झाला. दरम्यान, मराठवाड्यात काल सर्वत्र पावसानं हजेरी लावली. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात आज तुरळक ठिकाणी पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

****

ॲडलेड ओव्हल इथं बॉर्डर-गावस्कर चषक स्पर्धेत भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया संघात सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या आज दुसऱ्या दिवशी शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा आस्ट्रेलियाच्या ५ गडी बाद २३५ धावा झाल्या होत्या. काल पहिल्या दिवशी भारतीय संघाचा डाव १८० धावांत संपुष्टात आला. सध्या आस्ट्रेलियानं ५५ धावांची आघाडी घेतली आहे.

****